# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० - E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १८/१०/२०१८

**पोलीस स्मृती दिवस - मा.पंतप्रधान भारत सरकार यांचेतर्फे शहिद पोलीसांना श्रध्दांजली अर्पण समारोह राष्ट्रीय पोलीस स्मारक नवी दिल्ली येथुन कार्यक्रमाचे लाईव्ह वेबकास्ट पाहण्यासाठी नागरीकांना आवाहन**

---

संपुर्ण देशभरात दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय पोलीस स्मृती दिन म्हणुन साजरा केला जातो. देशाच्या अंतर्गत सुरक्षेचे दायित्व स्वीकारणारे विविध दलांचे पोलीस दल हे अति महत्वाचे आहे. पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांनी वेळो-वेळी केलेल्या पराक्रमांमुळे करोडो भारतवासी दररोज सुरक्षितपणे घरी परततात. पण डयुटीवर असणारे हे पोलीस आपल्या सेवेवर असतांना अनेक अवघड जबाबदा-या पार पाडत असतात, प्रसंगी प्राणांचीही आहुती द्यावी लागते. अशा सेवाव्रती पोलीस शहिदांच्या स्मृतीनिमित्त **२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृती दिन** म्हणुन साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने **भारत देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी** यांचे हस्ते दिल्लीतील चाणक्यपुरी येथे राष्ट्रीय पोलीस शहिद स्मारक (राष्ट्रीय पोलीस म्युझियमसह) लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

सन १९५९ मध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांनी चीनच्या सैन्याविरोधात अव्दितीय कामगिरी पार पाडली होती. या दिवशी सीआरपीएफच्या लहानशा पोलीस तुकडीने दाखविलेले धैर्य व देशासाठी दिलेले बलिदान कायम स्मरणात रहावे यासाठी दरवर्षी पोलीस स्मृतीदिन साजरा केला जातो. येत्या २१ ऑक्टोबर २०१८ रोजी देशातील पोलीस विभागातील शहिद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देशभरातील पोलीस मुख्यालये व पोलीस परेड मैदांनावर परेडव्दारे मानवंदना देण्यात येणार आहे.

दिनांक २१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०८:०० वा. दिल्ली राज्यातील चाणक्यपुरी येथे भारत देशाचे माननीय पंतप्रधान यांचे हस्ते राष्ट्रीय पोलीस स्मारकास मानवंदना दिली जाणार आहे. सदर कार्यक्रमाचे संपुर्ण प्रसारण लाईव्ह वेबकास्टव्दारे प्रसारीत करण्यात येणार आहे. त्यासाठी भारतीय पोलीस दलाचे संकेतस्थळ (**www.police.gov.in**) यावर जाऊन अथवा थेट (**http://webcast.nic.in/mha/ib**) या लिंकवर क्लिक करून सदर कार्यक्रमाची लाईव्ह वेबकास्ट पाहु शकता. देशभरातील शहिद पोलीसांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी **नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरीकांना आवाहन** करण्यात येते की, दिनांक २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ०८:०० वाजे पासुन आपले मोबाईल फोन अथवा संगणकावर सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण बघण्यासाठी वरील संकेतस्थळांवर भेट द्यावी. तसेच जास्तीत जास्त नागरीकांनी वरील संकेतस्थळ/लिंक सोशल मिडीयाव्दारे प्रसारीत करावी असे आवाहन करण्यात आले आहे.